# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO: ९००१:२०१५) (ISO/IES: २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र.: ०२२-६२५४२१००/१०३/१६४

ई-मेल:- secretary@msbte.com वेब: www.msbte.org.in


जा.क्र.मरातंशिमं/का-५४/प्र.सं.अ./२०२२-२३/ ६९६० दिनांक: 03 NOV 2022

**महत्त्वाचे / कालमर्यादीत परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र आणि अल्प मुदतीचे अभ्यासक्रम

राबविणा-या संस्था व स्वायत्त संस्था.

**विषय — संस्था मॉनिटरींग सॉफ्टवेअर मध्ये ऑनलाईन माहिती भरणेबाबत.**

उपरोक्त विषयानुसार AICTE मान्यता प्राप्त अभियांत्रिकी (स्वायत्त संस्थासह) पदविका संस्था, औषध निर्माणशास्त्र (फार्मसी) पदविका संस्था तसेच अल्प मुदतीचे अभ्यासक्रम राबविणा-या संस्था (Non-AICTE) यांचे संस्था अवेक्षण **शैक्षणिक वर्ष २०२२-२३** मध्ये **दि. ०१/१२/२०२२ ते १०/१२/२०२२** या कालावधीत करण्यात येणार आहे.

तरी मंडळाशी संलग्नित सर्व अभियांत्रिकी व फार्मसी, अल्प मुदतीचे अभ्यासक्रम राबविणा-या संस्था तसेच स्वायत्त संस्थांना मॉनिटरींग संदर्भातील सर्व माहीती ऑनलाईन भरण्यास **दि. ०९/११/२०२२ ते १८/११/२०२२** पर्यंत लिंक संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध करण्यात येईल. ज्या संस्थांचे फक्त एक वेळाच संस्था अवेक्षण केले जाते, अशा संस्थानी तसेच ज्या संस्थाचे NBA Accreditation झाले आहे अथवा ज्या संस्थांच्या अभ्यासक्रमाला Excellent दर्जा मिळाला आहे अशा सर्व संस्थानी देखील माहीती भरणे अनिवार्य आहे.

**संस्थानी भरलेल्या माहितीनुसार Online प्रणालीद्वारे त्याचा उपयोग मंडळाच्या विविध उपक्रमांमध्ये करण्यात येत असल्याने संबधित संस्था प्रमुखांनी सदर माहिती अचुक व परीपुर्ण असेल याची त्यांच्यास्तरावर खात्री करुन घ्यावी.**

वरील माहीती भरताना तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्याबाबत, **मोबाईल नं. ९९६०४५५७४८/८३५५८७०५४४** किंवा ई-मेल **acmonitoring@msbte.com** वर संपर्क साधावा, या शिवाय कोणत्याही अडचणी असल्यास संबंधित विभागीय कार्यालयास कळविण्यात याव्यात.

संस्थांनी **०८/११/२०२२** अखेर पर्यंतची शैक्षणिक माहिती भरणे अपेक्षीत असुन सदरची माहिती **दि. १८/११/२०२२** पर्यंत पुर्ण करुन submit करणे आवश्यक आहे. **दि. १९/११/२०२२ ते २२/११/२०२२** या कालावधीत **अभियांत्रिकी व फ्रामसी संस्थांसाठी रु.५०००/- आणि अल्प मुदतीचे अभ्यासक्रमाच्या संस्थांसाठी रु.३०००/-** एवढे विलंब शुल्क भरुन माहिती submit करता येईल, तथापि **दि. २३/११/२०२२** नंतर संस्थांना Online सॉफ्टवेअर मध्ये माहिती भरता येणार नाही. त्यामुळे सर्व संस्थांनी उपरोक्त कालावधीतच माहिती भरणे अनिवार्य आहे, याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेन्द्र रा.चितलांगे)

सचिव

म.रा.तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत:-उपसचिव, म.रा.तंत्र शिक्षण मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद यांना माहीतीसाठी.